प्रातःकाल
www.pratahkal.com

संपादकीय

विश्वासाची पुनर्परीक्षा!

एखाद्या राष्ट्राची परीक्षा केवळ विद्यार्थ्यांची नसते; ती त्या राष्ट्राच्या व्यवस्थेची, प्रामाणिकपणाची आणि न्यायव्यवस्थेवरील विश्वासाचीही असते. भारतात गेल्या काही वर्षांत सार्वजनिक परीक्षा म्हणजे गुणवत्तेचा उत्सव कमी आणि पेपरफुटीची भीती अधिक, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. नीट असो, भरती परीक्षा असो, राज्य लोकसेवा आयोगांच्या परीक्षा असोत किंवा इतर स्पर्धा परीक्षा, प्रत्येक परीक्षेपूर्वी लाखो विद्यार्थ्यांच्या मनात अभ्यासापेक्षा एकच प्रश्न अधिक मोठा उभा राहत होता. यावेळीही पेपर फुटणार का? या प्रश्नानेच भारतीय परीक्षा व्यवस्थेची विश्वासार्हता किती खोलवर हादरली आहे, याची कल्पना येते. अशा पार्श्वभूमीवर लोकसभेने सार्वजनिक परीक्षा सुधारणा विधेयक मंजूर केले, ही निःसंशय महत्त्वाची घटना आहे. मात्र कोणत्याही कायद्याचे यश त्यातील कठोर शिक्षांमध्ये नसते; ते त्या कायद्यामुळे नागरिकांचा हरवलेला विश्वास पुन्हा मिळतो का, यात असते.

या विधेयकाद्वारे २०२४ च्या कायद्यात अधिक कठोर तरतुदी करण्यात आल्या आहेत. पेपरफुटीच्या गुन्ह्यांची जलद चौकशी, विशेष तपास पथके, विशेष सरकारी वकील, फास्ट ट्रॅक न्यायालये आणि वेळबद्ध अपील प्रक्रिया यांचा त्यात समावेश आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, पेपरफुटी हा केवळ परीक्षा प्रक्रियेतील गैरव्यवहार नसून संघटित गुन्हेगारीचा प्रकार आहे, अशी भूमिका या कायद्याने स्पष्टपणे स्वीकारली आहे. ही दृष्टी योग्य दिशेने टाकलेले पाऊल म्हणावे लागेल. कारण प्रश्नपत्रिका विकणारे, उत्तरपत्रिका बदलणारे, बनावट उमेदवार उभे करणारे, डिजिटल प्रणाली हॅक करणारे आणि या संपूर्ण उद्योगातून कोट्यवधी रुपयांची कमाई करणारे रॅकेट देशभर पसरले असल्याचे अनेक तपासांत समोर आले आहे. परंतु कायद्याची कठोरता हा उपायाचा केवळ एक भाग आहे. मूळ प्रश्न आजही अनुत्तरित आहे. पेपर फुटतो तरी कसा? प्रश्नपत्रिका स्वतः चालत बाहेर येत नाही. तिच्या गुप्ततेची जबाबदारी असलेल्या यंत्रणेत कुठेतरी विश्वासघात होतो. एखादा अधिकारी, कर्मचारी, परीक्षा संस्था किंवा तांत्रिक व्यवस्थेतील दोषांशिवाय प्रश्नपत्रिका बाहेर पडणे अशक्य आहे. म्हणजेच प्रश्न केवळ गुन्हेगारांचा नाही; तो व्यवस्थेच्या नैतिकतेचा आहे. व्यवस्थेच्या आत भ्रष्टाचाराला संरक्षण मिळत असेल, तपासात हस्तक्षेप होत असेल आणि दोषींना राजकीय किंवा प्रशासकीय छत्रछाया लाभत असेल, तर कोणताही कायदा अपुरा ठरणार. त्यामुळे या विधेयकाची खरी परीक्षा बाहेरील दलालांपेक्षा आतल्या दोषींवर निर्भीड कारवाई करण्यात असेल.

गेल्या काही वर्षांतील घटनांनी विद्यार्थ्यांचा संयम संपवला होता. नीट पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर देशभर संतापाची लाट उसळली. विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांनी हा प्रश्न केवळ परीक्षा व्यवस्थेपुरता मर्यादित राहिला नाही; तो सामाजिक वेदनेचा विषय बनला. ६ जूनपासून विद्यार्थ्यांनी जंतरमंतरवर आंदोलन सुरू केले. २० जूनपासून ते अधिक संघटित झाले. कॉक्रोच जनता पार्टी या डिजिटल मोहिमेच्या माध्यमातून हजारो तरुण एकत्र आले. २८ जूनपासून सामाजिक कार्यकर्ते आणि वैज्ञानिक सोनम वांगचुक यांनी बेमुदत उपोषण सुरू केले. या सर्व घडामोडींकडे सुरुवातीला सरकारने अपेक्षित गांभीर्याने पाहिले नाही. आंदोलन दिल्लीपुरते मर्यादित राहील, असा कदाचित सत्ताधाऱ्यांचा समज असावा. पण सामाजिक माध्यमांनी हा विषय देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवला आणि अखेर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला.

याच पार्श्वभूमीवर लोकसभेत परीक्षा सुधारणा विधेयकावर चर्चा झाली. विरोधकांनी राष्ट्रीय परीक्षा संस्थांच्या उत्तरदायित्वाचा प्रश्न उपस्थित केला. ही मागणी रास्त होती. परीक्षा घेणाऱ्या संस्था चुकल्या तर त्यांची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. मात्र चर्चेदरम्यान आणखी एक प्रश्न अधिक ठळकपणे समोर आला. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित इतक्या महत्त्वाच्या विधेयकावर चर्चा होत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा सभागृहात उपस्थित का नव्हते? संसदीय लोकशाहीत प्रत्येक चर्चेला पंतप्रधान उपस्थित राहावेत, असा नियम नाही. परंतु देशभरात आंदोलन पेटलेले असताना, शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा झाल्यानंतर आणि परीक्षा व्यवस्थेवरील विश्वासाचा प्रश्न निर्माण झालेला असताना या चर्चेला प्रतीकात्मक महत्त्व निश्चितच होते. अशा वेळी सरकारच्या सर्वोच्च नेतृत्वाची उपस्थिती हा केवळ औपचारिकतेचा विषय नसून संवेदनशीलतेचा संदेश ठरला असता. याच काळात आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिस कारवाईबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित झाले. दिल्लीतील "चलो संसद" मोर्चावर लाठीचार्ज, अश्रुधुराचा वापर आणि इतर कारवायांबाबत विरोधकांनी सातत्याने स्पष्टीकरण मागितले. सरकारच्या वतीने केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी लोकसभेत गोळीबार झाला नसल्याचे सांगितले. मात्र कोणत्या परिस्थितीत कोणते आदेश देण्यात आले, पोलिसांनी कोणती शक्ती वापरली आणि त्याची जबाबदारी कोणाची होती, याबाबत अजूनही स्पष्ट माहिती सार्वजनिक झालेली नाही. लोकशाहीत आंदोलनकर्त्यांवर कारवाई करावी लागलीच, तरी तिचे उत्तरदायित्व निश्चित असले पाहिजे. कारण प्रश्न केवळ कायदा-सुव्यवस्थेचा नसून राज्य आणि नागरिक यांच्यातील विश्वासाचा असतो. यापेक्षाही मोठा प्रश्न म्हणजे संवादाचा. आंदोलन सुरू झाल्यानंतर जवळपास महिनाभर सरकारने थेट संवाद साधण्यास विलंब केला. अखेर विद्यार्थी प्रतिनिधींशी चर्चा झाली; परंतु तोपर्यंत परिस्थिती बरीच बिघडली होती. प्रशासनाच्या दृष्टीने कोणतेही आंदोलन नियंत्रणात ठेवण्यापेक्षा त्यामागील असंतोष समजून घेणे अधिक महत्त्वाचे असते. विशेषतः हा असंतोष देशातील गुणवत्ताधिष्ठित शिक्षणव्यवस्थेबद्दल असेल, तर सरकारने त्याकडे राजकीय चष्म्यातून नव्हे, तर राष्ट्रीय जबाबदारी म्हणून पाहणे आवश्यक असते. या संपूर्ण प्रकरणाने आणखी एक वास्तव स्पष्ट केले. आजची तरुण पिढी पारंपरिक माध्यमांपेक्षा सामाजिक माध्यमांवर अधिक विश्वास ठेवते. त्यामुळे सरकारची भूमिका मांडण्यासाठी जुन्या प्रचारयंत्रणा अपुऱ्या पडत आहेत. विश्वास हा एकतर्फी संदेशांनी निर्माण होत नाही; तो पारदर्शक कृतीतून निर्माण होतो. विद्यार्थ्यांनी अनुभवलेली अन्यायाची भावना केवळ सरकारी निवेदनांनी दूर होत नाही. त्यासाठी दोषींना शिक्षा झालेली दिसली पाहिजे, चौकशी निष्पक्ष झाली पाहिजे आणि परीक्षा प्रक्रिया अभेद्य झाली पाहिजे. लोकसभेने मंजूर केलेले परीक्षा सुधारणा विधेयक हा निश्चितच योग्य दिशेने टाकलेला टप्पा आहे. पण भारताच्या प्रशासकीय इतिहासाने एक धडा वारंवार दिला आहे. भारतात कायद्यांची कमतरता नसते; कमतरता असते ती त्यांच्या निर्भय आणि सातत्यपूर्ण अंमलबजावणीची. जर या कायद्यामुळे पेपरफुटीच्या साखळीतील प्रत्येक दोषी, मग तो दलाल असो, अधिकारी असो किंवा प्रभावशाली व्यक्ती असो, त्याच्यावर समान कठोरतेने कारवाई झाली, तरच विद्यार्थ्यांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास पुन्हा निर्माण होईल. अन्यथा हा कायदाही अनेक चांगल्या कायद्यांप्रमाणे सरकारी अभिलेखातील आणखी एक दस्तऐवज ठरेल. भारताच्या भविष्यासाठी ही केवळ परीक्षा सुधारण्याची वेळ नाही; तर विश्वास पुनर्स्थापित करण्याची वेळ आहे. कारण एखाद्या विद्यार्थ्याचे गुणपत्रक त्याचे भविष्य ठरवू शकते, पण परीक्षा व्यवस्थेवरील विश्वासच राष्ट्राचे भविष्य ठरवत असतो.

कठोर कायदे करणे सोपे असते; कठोर अंमलबजावणी करणे कठीण. पेपरफुटीच्या प्रत्येक प्रकरणात दोषींवर कोणताही भेदभाव न करता कारवाई झाली, परीक्षा प्रक्रिया खरोखर पारदर्शक झाली आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळाल्याचा विश्वास वाटला, तरच या कायद्याचे यश सिद्ध होईल. कारण विद्यार्थ्यांचे भविष्य केवळ परीक्षेच्या निकालावर ठरत नाही, तर त्या निकालामागील व्यवस्थेवर असलेल्या विश्वासावर ठरते. देशाला आज नव्या कायद्याइतकीच गरज आहे ती विश्वासार्ह आणि उत्तरदायी परीक्षा व्यवस्थेची.

अजिंक्य रहाणेची निवृत्ती मनाला चटका लावणारी

मैदानावर आणि मैदानाबाहेरही अत्यंत मृदू, शांत आणि संयमी स्वभावाचा असलेल्या आणि खऱ्या अर्थाने 'क्रिकेट हा सभ्य गृहस्थांचा खेळ' या व्याख्येला जागलेल्या अजिंक्य रहाणेने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्याची बातमी मनाला चटका लावून गेली. खरे तर भारतीय क्रिकेटमध्ये त्याचे अफाट योगदान होते. पण अनेक खेळाडूंना खराब फॉर्मातही अनेक संधी दिल्या गेल्या असताना अजिंक्यला त्याच्या कारकिर्दीत निवड समितीने अनेकदा संघाबाहेर ठेवले आणि योग्य न्याय दिला नाही. २०२०-२१ च्या ऐतिहासिक ऑस्ट्रेलिया दौऱ्यात जेव्हा भारतीय संघ ॲडलेड कसोटीमध्ये अवघ्या ३६ धावांवर बाद झाला तेव्हा अजिंक्यने विराटच्या अनुपस्थितीत भारतीय संघाचे नेतृत्व सांभाळले. स्वतः मेलबर्नमध्ये शतकी खेळी केली आणि नवख्या खेळाडूंच्या बळावर भारताला 'बॉर्डर-गावस्कर चषक' जिंकून दिला. क्रिकेट इतिहासातील आजवरचा हा सर्वात मोठा विजय मानला जातो. देशांतर्गत क्रिकेटमध्येही त्याचे योगदान अतुलनीय राहिले. मुंबई क्रिकेटला पुन्हा गतवैभव मिळवून देत त्याने त्याच्या नेतृत्वाखाली मुंबईला २०२३-२०२४ मोसमात ४२वे रणजी विजेतेपद मिळवून दिले. अजिंक्यचे व्यक्तिमत्व सचिन, विराट किंवा रोहित यांच्यासारखे ग्लॅमरने भरलेले आणि प्रसिद्धीच्या झगमगाटाचे नव्हते तर आदर आणि विश्वासाचे होते. अजिंक्य, तुझी भारताची कसोटी कॅप क्रमांक २७८ आता निरोप घेत असली तरी तुझ्या कोट्यवधी क्रिकेट चाहत्यांच्या मनात आणि भारतीय क्रिकेटच्या इतिहासात तिचे स्थान कायम 'अजिंक्य' राहणार आहे. पुढील वाटचालीस तुला शुभेच्छा!

गुरूंचे महत्त्व

गुरु-शिष्य परंपरा हे भारताचे वैशिष्ट्य आहे. शिष्याच्या जीवनातील अंधःकाराचा नाश करून त्याला ईश्वरापर्यंत नेण्याचे कार्य गुरु करत असतात. गुरु हे पृथ्वीवरचे ईश्वराचे सगुण रूप असतात आणि गुरूंचे निर्गुण रूप म्हणजे ईश्वर असतो.

'गु' म्हणजे अज्ञानरूपी अंधःकार आणि 'रु' म्हणजे त्या अंधःकाराचा नाश करून त्याला जे ज्ञानरूपी प्रकाशाकडे नेतात त्यांना गुरु असे म्हणतात. त्याचप्रमाणे शिष्याचे अज्ञान घालवून त्याची आध्यात्मिक उन्नती व्हावी यासाठी त्याला साधना सांगतात आणि त्याच्याकडून ती करवून घेतात त्याला अनुभूती देतात त्यांना गुरु असे म्हणतात. गुरु हे शिष्याच्या व्यवहारिक सुखाकडे कधीच लक्ष देत नाहीत. कारण ते त्याच्या प्रारब्धानुसार असते. गुरु फक्त शिष्याची अध्यात्मिक प्रगती कशा प्रकारे होईल? इतकेच पाहत असतात. ईश्वर निर्गुण असल्याने तो आपल्याशी प्रत्यक्षपणे बोलू शकत नाही. यासाठीच तो गुरूंची आणि आपली भेट घडवून आणतो. आपल्यामध्ये जर गुरूप्राप्तीची तीव्र तळमळ असेल तर त्या एका गुणामुळे आपल्यावर गुरूंची कृपा होऊन आपल्याला गुरुप्राप्ती होते. असे गुरूंचे महत्त्व आहे.

- भीमराव साळुंखे ,सातारा.

स्टार्टअप्समधील गुंतवणूक बळकट व्हावी!

स्टार्ट अप या परिसंस्थेला देशात दहा वर्षे पूर्ण झाली. देशात सुमारे २१२००० हून अधिक स्टार्ट अप्स परिसंस्था कार्यरत आहेत. फिनटेक, हेल्थटेक, कृषी, उत्पादन, शिक्षण, माहिती तंत्रज्ञान, हरित ऊर्जा, कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या विविध विषयांवर महाराष्ट्रात ३३,८७२ स्टार्ट अप्स परिसंस्था उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. मुंबई,पुणे, नाशिक, ठाणे ही शहरे माहिती तंत्रज्ञान, ऑटोमोबाइल्स, कृत्रिम बुद्धिमत्ता सॉफ्टवेअर, डीप टेक, बायोटेक, क्षेत्रात नवीन उद्योग वेगाने सुरु होत आहेत. तंत्रज्ञान आधारित विज्ञानाच्या वाढीत महाराष्ट्राची भूमिका सर्वाधिक महत्वाची ठरत आहे. ड्रोन इलेक्ट्रिक वाहने, आरोग्य तंत्रज्ञान या विभागांत राज्याची गुंतवणूक आणि स्टार्टअप्स यांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. पुणे हे राज्यातील प्रमुख स्टार्टअप केंद्र बनले असून नव ऊद्योजकांसाठी आकर्षण केंद्र बनले आहे. राज्यातील पुणे, मुंबई यांसारखी शहरे संशोधन संस्था, उद्योजक आणि गुंतवणूकदार यांना जोडणारी प्रमुख केंद्रे म्हणून ओळखली जात आहेत. त्यांना जागतिक पातळीवर प्रमुख स्टार्टअप केंद्रातील स्टार्टअप्स परिसंस्थाशी स्पर्धात्मक सामना करण्यासाठी प्रयत्न करण्याची संधी मिळत आहे. त्या संधींचा फायदा घेतल्यास स्टार्ट अप्स परिसंस्था अधिक बळकट होऊ शकतात. त्यामुळेच राज्यातील उच्च शिक्षण संस्था, संशोधन केंद्रे, उद्योगस्नेही वातावरण, गुंतवणूकदारांची उपलब्धता यांच्या जोरावर मजबूत बनत असलेली राज्याची भूमिका राज्याला उच्च स्थानाला जास्तीत जास्त काळ टिकवून ठेवील असा विश्वास वाटतो.

जाहीर नोटीस

याद्वारे नोटीस देण्यात येते की, **दिवाण निकेतन को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेडचे** सदस्य, **दिवंगत श्री. ईश्वरदास साईदास उप्पल** हे सोसायटीच्या इमारतीमधील अंदाजे **२४५ चौ. फूट** क्षेत्रफळ असलेल्या **तळमजल्यावरील शॉप (दुकान) क्र. ९** चे मालक होते आणि ते **३०१ ते ३१५** विशिष्ट शेअर (भाग) क्रमांक असलेले **शेअर प्रमाणपत्र क्र. २१अ** आणि ५ विशिष्ट शेअर्स असलेले **शेअर प्रमाणपत्र क्र. २२** धारण करत होते आणि **इमारत क्र. ६, खोली क्र. १५९, हजारा को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., सायन-चुनाभट्टी, मुंबई-४०००२२ येथे वास्तव्यास होते.** सदर **श्री. ईश्वरदास साईदास उप्पल** यांचे उपरोक्त जागा/शेअर्सच्या **संदर्भात कोणतेही नामनिर्देशन न करता २२ फेब्रुवारी २०२४** रोजी निधन झाले.

मृत सदस्याच्या कायदेशीर वारसांनी निष्पादित केलेल्या **दिनांक ३१ जुलै २०२५ रोजीच्या नोंदणीकृत हक्कसोड** पत्रानुसार, उपरोक्त **शॉप क्र. ९** च्या संदर्भातील अधिकार, हक्क आणि हितसंबंध मृत सदस्याचा मुलगा **श्री. अमित ईश्वरदास उप्पल** यांच्या बाजूने सोडण्यात आणि/किंवा हस्तांतरित करण्यात आले आहेत.

त्यानुसार, **श्री. अमित ईश्वरदास उप्पल** यांनी मृत सदस्याचे शेअर्स आणि सोसायटीच्या भांडवल/मालमत्तेतील हितसंबंध त्यांच्या नावे हस्तांतरित करण्यासाठी सोसायटीकडे अर्ज केला आहे.

सोसायटी याद्वारे कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींना वारसाहक्क, उत्तराधिकार, धारणाधिकार, प्रभार, गहाणखत, बक्षीस, ट्रस्ट, देखभाल, ताबा किंवा इतर कोणत्याही मार्गाने उपरोक्त शेअर्स आणि सोसायटीच्या भांडवल/मालमत्तेतील मृत सदस्याच्या हितसंबंधांबाबत कोणताही दावा, अधिकार, हक्क, हितसंबंध किंवा आक्षेप असल्यास, तो या नोटिशीच्या प्रकाशनाच्या तारखेपासून **१५ (पंधरा) दिवसांच्या** आत सोसायटीच्या नोंदणीकृत कार्यालयात सोसायटीच्या मानद सचिवांकडे पुष्ट्यर्थ कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात सादर करण्याचे आवाहन करत आहे.

उपरोक्त कालावधीत कोणताही दावा किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास, सोसायटी महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० च्या तरतुदी, त्याअंतर्गत तयार केलेले नियम आणि सोसायटीच्या उपविधींनुसार कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना कोणताही पुढील संदर्भ न देता मृत सदस्याचे शेअर्स आणि हितसंबंध **श्री. अमित ईश्वरदास उप्पल** यांच्या नावे हस्तांतरित करण्याची कार्यवाही करेल आणि त्यानंतर प्राप्त झालेला कोणताही दावा सोसायटीच्या मर्यादेपर्यंत सोडून दिला आहे असे मानले जाईल.

विहित कालावधीत प्राप्त झालेल्या कोणत्याही दाव्यांचा किंवा आक्षेपांचा सोसायटीकडून काटेकोरपणे महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० च्या तरतुदी, त्याअंतर्गत केलेले नियम आणि सोसायटीच्या उपविधींनुसार विचार केला जाईल आणि ते हाताळले जातील.

सोसायटीच्या उपविधींची एक प्रत नोटिशीची मुदत संपेपर्यंत सर्व कामकाजाच्या दिवशी **सकाळी १०:०० ते संध्याकाळी ६:००** या कामकाजाच्या वेळेत सोसायटीच्या कार्यालयात पाहणीसाठी उपलब्ध आहे.

ठिकाण: मुंबई **दिवाण निकेतन को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेडच्या**
दिनांक: ०१.०८.२०२६ **वतीने आणि करिता**
मानद सचिव / अध्यक्ष

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (परसेवा)

बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., मुंबई
११२, सौरभ बिल्डींग, मोदी इस्टेट, लाल बहादुर शास्त्री मार्ग,
घाटकोपर पोलीस स्टेशन समोर, घाटकोपर (प.), मुंबई - ४०० ०८६.

जाहीर नोटीस

श्री विश्वपांचाळ सहकारी पतसंस्था **... अर्जदार**
६/३, संत निवृत्ती को.ऑप.हौ.सोसायटी, आरे रोड, गोरेगांव (पु), मुंबई ४०००६३.

Assistant Registrar Co-op. Soc., Recovery, Ghatkopar (W).
Gen. Outward No. 2364
Date : 31/07/2026

अनुक्रमांक १ ते १५ **... जाब देणार**

खालिल दर्शविलेल्या जाब देणार यांना नोटीस देण्यात येते की, थकीत कर्जाविषयी अर्जदार संस्थेने दाखल केलेल्या वसुली अर्जाबाबत तुमचे म्हणणे सादर करणेसाठी आपणास उपलब्ध पत्यावर नोटीस देण्यात आली होती. तथापि सदर पत्यावर आपण राहत नसल्याने तसेच आपला विद्यमान पत्ता उपलब्ध नसल्याने सदर नोटीसद्वारे आपणास एक शेवटची संधी देण्यात येत असून **दिनांक १४/०८/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता** आपण स्वत: वरील पत्यावर हजर राहून आपले म्हणणे नमूद करावे. सदर दिवशी आपण हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत अर्जाची चौकशी करण्यात येऊन एकतर्फी योग्य तो निर्णय घेतला जाईल याची आपण लक्षपूर्वक नोंद घ्यावी.

जाब देणार आणि दाखल केलेल्या दाव्यांची माहिती खालिलप्रमाणे :-

अ. क्र.	जाब देणाऱ्याचे नाव	जाब देणार क्रमांक	अर्ज दाखल दिनांक	दावा अर्ज क्रमांक	दावा रक्कम रुपये	पुढील सुनावणी तारीख
१	अजितकुमार महादु पोतदार	१	१३.०२.२६	३०५८	११८७६६	१४.०८.२६
२	प्रिया अजितकुमार पोतदार	२	१३.०२.२६	३०५८	११८७६६	१४.०८.२६
३	विलास रामचंद्र देशमुख	३	१३.०२.२६	३०५८	११८७६६	१४.०८.२६
४	राजेश मुरलीधर दलाल	१	२१.०५.२६	२७२	८०८८५	१४.०८.२६
५	समीर मुरलीधर दलाल	२	२१.०५.२६	२७२	८०८८५	१४.०८.२६
६	यशवंत दत्तात्रय गोणे	३	२१.०५.२६	२७२	८०८८५	१४.०८.२६
७	रोहित हरिश्चंद्र पडवळ	१	२१.०५.२६	२७४	१२५५०५	१४.०८.२६
८	तुकाराम हरिश्चंद्र भोईर	२	२१.०५.२६	२७४	१२५५०५	१४.०८.२६
९	प्रतिक जगन्नाथ वाळिंबे	३	२१.०५.२६	२७४	१२५५०५	१४.०८.२६
१०	गणेश शंकर वाघेरे	१	२१.०५.२६	२७३	१००७९०	१४.०८.२६
११	रुपाली विश्वास भोईर	२	२१.०५.२६	२७३	१००७९०	१४.०८.२६
१२	रविंद्र प्रकाश वाघेरे	३	२१.०५.२६	२७३	१००७९०	१४.०८.२६
१३	सुचिता राजेंद्र मेस्त्री	१	२०.१२.२५	२१११	६१९४७	१४.०८.२६
१४	नरेंद्र पांडुरंग मेस्त्री	२	२०.१२.२५	२१११	६१९४७	१४.०८.२६
१५	नेहा श्रीकांत अंडागळे	३	२०.१२.२५	२१११	६१९४७	१४.०८.२६

ही नोटीस आज दिनांक ३१/०७/२०२६ रोजी माझे सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिली आहे.

शिक्का

सही/-
श्री. दिपक पाडवी
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (परसेवा)
बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित, मुंबई

जाहीर नोटीस

कमला रमेश करुणाकर या गोकुळ विहार १ सीएचएस लि., ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली (पूर्व), मुंबई ४००१०१ येथे स्थित असलेल्या इमारतीमधील ३९.२१ चौ. मी. (बिल्ट-अप) क्षेत्रफळ असलेल्या फ्लॅट क्र. सी/५०१ या निवासी जागेच्या मालक होत्या आणि त्यांच्याकडे शेअर प्रमाणपत्र क्र. १९ मधील अनुक्रमांक ३४१ ते ३४५ (दोन्ही समाविष्ट) असलेले प्रत्येकी रु. ५०/- प्रमाणे एकूण रु. २५०/- चे पूर्ण भरलेले ५ शेअर्स (भाग) देखील होते.

सदर **कमला रमेश करुणाकर** (ज्यांना यापुढे सदर दिवंगत* असे संबोधले जाईल) यांचे २३ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबई येथे कोणतेही मृत्युपत्र न करता निधन झाले. त्यांच्या निधनाच्या वेळी त्यांना लागू असलेल्या वैयक्तिक कायद्यानुसार त्यांचे एकमेव वारस आणि कायदेशीर प्रतिनिधी म्हणून **१) श्री. मधुकर रमेश करुणाकर (मुलगा), २) सौ. सुजाता भास्कर कर्केरा (विवाहित मुलगी) आणि ३) श्री. दीपक रमेश करुणाकर (मुलगा)** हे आहेत. **श्री. रमेश बी. करुणाकर** (स्व. कमला रमेश करुणाकर यांचे पती) **यांचे २५ ऑगस्ट २००२ रोजी मुंबई येथे निधन झाले.** जर कोणत्याही व्यक्तीचा/व्यक्तींचा स्व. **कमला रमेश करुणाकर** यांचे कायदेशीर वारस म्हणून सदर अनुसूचित मालमत्तेवर किंवा त्यापैकी कोणत्याही भागावर गहाणखत, विक्री, हस्तांतरण, अभिहस्तांकन, भाडेपट्टा, परवाना, धारणाधिकार, प्रभार, ट्रस्ट, बक्षीस, विनिमय, ताबा, सुखाधिकार, भाडेकरू किंवा अन्य कोणत्याही मार्गाने कोणताही दावा असल्यास, त्यांनी या नोटिशीच्या प्रकाशनाच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत खालील स्वाक्षरीकर्त्यांना खाली दिलेल्या पत्त्यावरः शॉप क्र. ३३, इमारत क्र. ६८, एव्हरशाईन मून सीएचएस लि., ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व), मुंबई ४००१०१ येथे लेखी स्वरूपात कळवावे. उपरोक्त कालावधीत कोणतेही दावे/आक्षेप प्राप्त न झाल्यास, सदर अनुसूचित मालमत्तेवर कोणताही दावा करणारी व्यक्ती नाही असे मानले जाईल.

दिनांक: ०१.०८.२०२६ **सही/-**
ठिकाण: मुंबई **संगीता पंत**
वकील, मुंबई उच्च न्यायालय

एसबीएम बँक (इंडिया) लि.

SBM bank
नोंदणीकृत कार्यालय: १०१, रहेजा सेंटर, पहिला मजला, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१, महाराष्ट्र

स्थावर तारण मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर सूचना
(सरफेसी कायदा, २००२ सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटी इंटरेस्ट (एंफोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८(६) अन्वये)

कर्जदार(रे), सह-कर्जदार(रे), जामीनदार(रे) आणि सर्वसाधारण जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, **एसबीएम बँक (इंडिया) लि.** चे प्राधिकृत अधिकारी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ आणि त्याअंतर्गत बनविलेल्या नियमांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, सदर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून **३० (तीस)** दिवसांची मुदत संपल्यानंतर खाली नमूद तारण मालमत्ता विकण्याचा मानस बाळगत आहेत. **कर्जदार/जामीनदार:** मे. स्मितेश सी शाह अँड कंपनी, श्री. स्मितेश शाह, श्रीमती इशिता शाह आणि श्रीमती प्रेमकुमारी स्मितेश शाह; कर्ज खाते क्र.: **२००१२३१५५४५००२;** येणे रक्कमः **रु. १,९७,४५,७४८/- (रुपये एक कोटी सत्याण्णव लाख पंचेचाळीस हजार सातशे अठ्ठेचाळीस फक्त)** त्यावरील पुढील व्याज, खर्च, शुल्क, अनुषंगिक खर्च आणि इतर सर्व येणी रकमांसह. **तारण मालमत्तेचे वर्णन:** फ्लॅट क्र. ६०६, ६वा मजला, पर्ल रेसिडेन्सी-ए विंग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत, जे.पी. रोड, वाडिया शाळेसमोर, अंधेरी वेस्ट, मुंबई-४०००५३ येथील मालमत्तेचा संपूर्ण भाग व विभाग, क्षेत्रफळ ७४३.०४ चौ. फूट (६९.०५ चौ. मी.) कार्पेट क्षेत्र, दोन कार पार्किंग जागांसह, सी.टी.एस. क्र. ८०८ (भाग), ८१७ (भाग) व ८१८ (भाग), मौजे आंबिवली, अंधेरी वेस्ट, मुंबई-४०००५३ या जमिनीवर स्थित. कर्जदार/जामीनदार यांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत, संपूर्ण येणे रक्कम, त्यावरील पुढील व्याज, खर्च, शुल्क व अनुषंगिक खर्चासह फेडावी, अन्यथा प्राधिकृत अधिकारी कोणत्याही पुढील सूचनेशिवाय, सरफेसी कायदा, २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या तरतुदींनुसार वरील तारण मालमत्तेच्या विक्रीची कार्यवाही करतील. कर्जदार/जामीनदार आणि सर्वसाधारण जनतेचे लक्ष सरफेसी कायदा, २००२ च्या तरतुदींकडे, विशेषतः वरील तारण मालमत्तेशी व्यवहार करणारी कोणतीही व्यक्ती बँकेच्या हक्कांच्या अधीन राहूनच व्यवहार करेल, याकडे वेधण्यात येत आहे.

दिनांक: ०१.०८.२०२६, स्थळ: मुंबई, महाराष्ट्र **प्राधिकृत अधिकारी, मे. एसबीएम बँक (इंडिया) लि.**

सेंटरॅक टेक्नॉलॉजीज लिमिटेड

३०७, रीजेंट चेंबर्स, नरीमन पॉईंट, मुंबई, महाराष्ट्र, ४०००२१
ईमेल: investors@centerac.in **वेबसाईट:** www.centerac.in
सीआयएन: L17231MH1993PLC071975

व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) / इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांद्वारे (ओएव्हीएम) आयोजित केल्या जाणाऱ्या ३३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

याद्वारे नोटीस देण्यात येते की, कंपनीची **३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम),** कंपनी कायदा, २०१३ ('कायदा') आणि त्याअंतर्गत बनवलेले नियम आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या लागू तरतुदींचे तसेच कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय ('एमसीए') आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया ('सेबी') यांनी या संदर्भात जारी केलेल्या सर्व लागू परिपत्रकांचे पालन करून, सदस्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय, आगामी ३३ व्या एजीएमच्या नोटिशीमध्ये नमूद केलेल्या कामकाजावर विचार करण्यासाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी*) / इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांद्वारे (ओएव्हीएम*) आयोजित केली जाईल.

लागू असलेल्या एमसीए आणि सेबी परिपत्रकांनुसार, आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल आणि एजीएमची नोटीस ज्या सदस्यांचे ईमेल पत्ते कंपनी/डिपॉझिटरीज/आरटीए/डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे नोंदणीकृत आहेत, त्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवली जाईल. वरील परिपत्रकांनुसार प्रत्यक्ष प्रती पाठवण्याची आवश्यकता रद्द करण्यात आली आहे. आर्थ